# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३**

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**बाब क्रमांक: ५८, रूपये:- ८,०००/-**<br>**श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१) | ६००६ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली व लाखांदूर तालुक्यातील जिल्हा परिषद, प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांना पुरेशा प्रमाणात वर्गखोल्या उपलब्ध नसणे, संगणक (डिजीटल वर्गखोल्या ) उपलब्ध नसणे, साकोली , लाखांदूर व तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या ईमारती हया जिर्णावस्थेत असणे, पुरेशा प्रमाणात शिक्षकांची कमतरता असणे, त्यामुळे शालेय विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०४, क्रीडा व युवक सेवा**<br>**बाब क्रमांक: ६८, रूपये:- ३८,७०,८५,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे,ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२) | ५९६२ | १० | बुलढाणा जिल्हयातील मलकापुर व नादुरा तालुक्यामध्ये नव नवीन खेळाडू निर्माण होणे करिता तसेच प्रत्येक खेळाचे प्रशिक्षण मिळणेकरीता क्रीडा संकुले अत्याधुनिक करण्यासाठी निधीची तरतूद करणे गरजेचे आहे तरी दोन्ही तालुक्यांमध्ये निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे,श्री. राजेश एकडे** |
| (३) | ५९१४ | १० | अंजनगाव सू. जि. अमरावती येथे जागेअभावी अद्यापही तालुका क्रीडा संकुल नसणे , या तालुक्यातील खेळाडू मोठ्या प्रमाणात जिल्हा स्तर, राज्यस्तर, राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत असणे, परंतु क्रीडा संकुल अभावी येथील खेळाडूंची गैरसोय होत असणे, अंजनगाव सू. येथे क्रीडा संकुल बांधकामासाठी कृषि विभागाच्या बिजउत्पादण विभागाची पडीत असलेली जमिनीची मागणी असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत वारंवार लेखी पाठपुरावा केलेला असणे, तसेच तत्कालीन क्रीडामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तालुका क्रीडा संकुल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | बांधकामास जागा उपलब्ध करून देणेबाबत क्रीडा विभागास सूचना केलेली असणे, परंतु अद्यापही तालुका क्रीडा संकुल बांधकामास जागा उपलब्ध झालेली नसणे, अंजनगाव सु. येथे तालुका क्रीडा संकुल बांधकाम करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: ई-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२०४, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: ७१, रूपये:- ४,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (४) | ६०२३ | १० | मुंबादेवी विधानसभा क्षेत्रातील मुंबई मनपाच्या अखत्यारीत येणा-या शाळांमध्ये सीबीएससी बोर्डाचे शिक्षण सुरु करणे व त्या शाळा अत्याधुनिक करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई